# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 377/2022 दिनांक : 01.10.2022

## 1)खुनः—

**बिलोली** :—दिनांक 29.09.2022 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **कासराळी फिर्यादीचे राहते घरी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे लालु पिराजी इंगळे, वय 60 वर्षे, रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड,** यांचे जेवणाचे ताट त्यांची सुन व आरोपीची पत्नी हिने उचलेले नाही या कारणावरुन आरोपी सोबत मयत यांनी वाद करुन त्यांच्या जवळील चाकु हातामध्ये घेवून ते आरोपीच्या अंगावर धावून येत असतांना त्यांना त्यांची सुन व फिर्यादी यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला असता दोघीच्यांही हाताला चाकु लागला तरीही मयत हे ऐकत नव्हते व आरोपीच्या अंगावर धावून जात होते तेंव्हा आरोपीने घरातील कुऱ्हाडीने मयत यास मारुन गंभीर जखमी करुन खुन केला. वगैर **फिर्यादी पार्वतीबाई लालु इंगळे वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरन 209/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री आर.एम. केंद्रे मो.नं. 9850827563** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**शिवाजीनगर** :—दिनांक 21.09.2022 रोजी 22.00 ते दिनांक 22.09.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **वसंतनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पाण्याची मोटार व रिकामा गॅस सेलंडर एकुण किंमती 3,000/— रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी महेद्रसिंह प्रतापसिंह गौर, वय 45 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. वसंतनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 362/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्र. 9075479885** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :—

**देगलूर** :— दिनांक 30.01.2017 रोजी 10.00 वा. ते आज पावेतो, **सहयोगनगर कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली ह.मु. आंबेडकर नगर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस नांदेड येथे घर घेण्यासाठी तुझ्या माहेरहुन दहा लाख रुपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीचे चारित्र्यावर संशय घेवून तिचा शारिरिक व मानसिक छळ केला व उपाशीपोटी ठेवून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 463/2022 कलम 498(अ),506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**सोनखेड** :— दिनांक 27.09.2022 रोजी 20.00 वा. ते 23.30 वा. चे सुमारास, **नांदेड ते उस्माननगर जाणारे राष्ट्रीय महामार्गावरील रोडवर लोंढे सांगवी फाटया समोर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे त्र्यंबक नागोराव इंगळे, रा. चौथी धर्मापुरी ता. कंधार जि. नांदेड** हा त्याची मो सा. क्र. एमएच—26/एएम—8305 वर बसुन नमुद ठिकाणावरुन जात असताना रोडचे डावे बाजू कडून रोडवर मालवाहुन ट्रक क्रं. 135 च्या चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक धोकादायक स्थितीत निष्काळजीपणाने रोडवर उभा करुन ठेवला त्या ट्रकचे पाठामागील रिप्लेक्टर लाईट व कोणत्याही प्रकारच्या निशाण्या न लावता सुरक्षितता न बाळगता तो हयगय व निष्काळजीपणे उभा केल्याने सदर ट्रकच्या पाठीमागुन मयत हा धडकल्याने गंभीर जखमी झाल्याने मरण पावला त्याचे मरणास सदर ट्रक चालक कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी दिगंबर विनायकराव इंगळे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. चौथी धर्मापुरी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 141/2022 कलम 279,283,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री परिहार, मो.क्र. 9561038001** हे करीत आहेत.

## 5)आत्महत्येस प्रवृत्त केले :—

**इतवारा** :—दिनांक 27.07.2022 रोजी 10.30 वा. ते 11.00 वा. चे सुमारास, **हैदरबाग गल्ली नेकलेस रोड, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे पती **मयत नामे मोहमद खाजा हुसेन मोहमद इकबाल, वय 42 वर्षे, व्यवसाय सेल्समन रा. हैदबाग गल्ली नेकलेस रोड, नांदेड** यास पैश्याचे घोटाळा केल्या बाबत यातील नमुद आरोपीने खोटे आरोप लावुन वारंवार मानसिक त्रास देवून मयतास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी तहसिन बेगम मोहमद खाजा हुसेन, वय 42 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. हैदरबाग गल्ली नेकलेस रोड नांदेड ह.मु. आसरानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 270/2022 कलम 306 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बेग, मो.नं. 02462—236510** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 29.09.2022 रोजी 23.45 वा. चे सुमारास, **पारनेरकर महाराज यांचे मठाचे समोर सार्वजनिक ठिकाणी रोडच्या बाजुस कौठा,नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन आपले ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या शस्त्र (खंजर) ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/चंद्रकांत सुभाष स्वामी, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 589/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2168 शेख जावेद, मो.क्र. 8999978576** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 29.09.2022 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर गोविंदनगर, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी यांचे घरासमोर येवून आवाज देवून म्हणाले की, तुझ्या मुलाने दोन महिन्यापुर्वी दिलेली केस मागे घे नाहीतर त्याला खतम करतो म्हणुन धमकी दिली व शिवीगाळ केली व हातातील काठीने डोक्यात मारले तसेच तलवारीने डोक्यात मारुन दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी वेणुताई दशरथ जारंडे वय 45 वर्षे व्यवसाय मजुरी रा. गोविंदनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 330/2022 कलम 324,323, 504,506,34 भादवी सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री पांचाळ, मो.क्र. 9049325522** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**हिमायतनगर :–** दिनांक 30.09.2022 रोजी 15.05 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहते घरासमोर मौजे पोटा ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 4060/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी मपोउपनि/श्रीमती स्मिता दिलीपराव जाधव, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 222/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री एल.एस.कदम, मो.क्र. 7350671239** हे करीत आहेत.

## 8)विषारी औषध पिवून आत्महत्या :–

**उस्माननगर :–** दिनांक 28.09.2022 रोजी 06.25 वा. चे सुमारास, **आधार हॉस्पीटल नांदेड, येथे,** यातील **मयत नामे मधुकर संजय रामा वसुरे वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड**, यांनी सतत नापीकी होत असल्यामुळे व कर्जबाजारी पणाला कंटाळुन विषारी औषध पिवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार माधव मारोती वसुरे वय 40 वर्ष व्यवसाय शेती रा. हाता ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. 39/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री भारती, मो.नं. 8378989949** हे करीत आहेत.

## 9)विज पडुन मृत्यु :–

**रामतीर्थ :–**दिनांक 29.09.2022 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **मौजे बेळकोणी खु. ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दिगांबर आनंदा आनमूलवार, वय 40 वर्षे, रा. बेळकोणी खु ता. रामतीर्थ जि. नांदेड**, हे शेताकडे वानेर हाकलण्यासाठी म्हणुन गेला त्या दरम्यान अंगावर विज पडून जागीच मरण पावला. वगैरे **खबर देणार किशन गोविंदराव आनमूलवार, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेळकोणी खु. ता. बिलोली जि. नांदेड**, यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे रामतीर्थ** आ. मृ. 25/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2476 पठाण, मो.नं. 9823027725** हे करीत आहेत.

## 10)पाण्यात बडुन मृत्यु :–

**हिमायतनगर :–**दिनांक 30.09.2022 रोजी 15.00 वा. ते 15.30 वा. चे दरम्यान, **मौजे हिमायतनगर शिवारातील शेतातील विहीरीत ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर पोतन्ना बलपेलवाड, वय 28** वर्षे, **व्यवसाय शेती रा. चौपाटी ता. हिमायतनगर जि. नांदेड,** हा त्यांचे काकाचे विहीरीवर पाणी पिण्यासाठी गेला असता पाण्यात बुडून मरण पावला वगैरे **खबर देणार विजय राजाराम बलपेलवाड, वय 38** वर्षे, **व्यवसाय शेती रा. लकडोबा चौक हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **39**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो.नं. 9763916381** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड